Pune Police

प्रेसनोट दि. १०/११/२०१६

**घरफोडी व वाहन चोरी करणारे सराईत गुन्हेगारांना गुन्हे शाखा, युनिट ५ पुणे शहर यांनी केले जेरबंद.**

दि.२५/१०/२०१६ रोजी युनिट-५ चे कार्यक्षेत्रात हडपसर पो.स्टे.चे हददीत फिर्यादी नामे- मेहबुबु रऊफ शेख रा. माळवाडी रोड हडपसर पुणे यांनी त्यांची लाल रंगाची तवेरा नं. **MH13-B-2620** हि स्मशानभुमी हडपसर जवळ पार्क केली असता कोणी तरी अज्ञात आरोपीने चोरुन नेली म्हणुन हडपसर पो.स्टे.गु.र.नं. ७२९/२०१६ भा.दं.वि.कलम- ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला होता. दाखल गुन्हयात आरोपींनी कसलाही पुरावा मागे ठेवला नव्हता.

दाखल गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा, युनिट ५ पुणे शहर कडील स्टाफ करीत असताना पोलीस नाईक भरत रणसिंग यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, दाखल गुन्हा हा शिकलकरी समाजातील आरोपींनी केलेला असुन ते चोरीची तवेरा कार व पॅशन मोटर सायकल घेवुन त्यांचेकडील चोरीचा मुददेमाल विक्रीकामी रामटेकडी येथुन हडपसर येथे जाणार आहेत अशी खात्रीशिरपणे माहिती मिळाली.

सदरची माहिती प्रमाणे व.पो.निरी. एम.एम.मुजावर यांचे मार्गदर्शनाखाली युनिट- ५ कडील पोलीस स्टाफ यांनी बातमीप्रमाणे गोसावी वस्ती हडपसर येथे सापळा लावुन आरोपी नामे- १) बिरजुसिंग रजपुतसिंग दुधानी वय-२९ रा. स.नं.११०, अंधशाळेमागे, शिकलकरी वस्ती, रामटेकडी, वानवडी पुणे २) राहुल बाळासाहेब शेंडकर वय-२३ वर्ष रा. स.नं.११०, अंधशाळेमागे, रामटेकडी, वानवडी पुणे यांचे ताब्यातील लाल रंगाची तवेरा नं. **MH14-CK-202** (मुळ नं.**MH13-B-2620**) हिची तपासणी करता चालकाचे शिट खाली एका कापडी पिशवी त्यामध्ये सोन्याचे दागिने २० ग्रॅम वजनाचे, वेगवेगळी चांदीची भांडी त्यामध्ये चांदीचे ताट गडवा, फुलपात्रे व इतर भांडी असे चोरच्या गुन्हयातील तसेच पाठीमागील बाजुचे सिटखाली एक नायलॉन पोते त्या मध्ये एक मोठे लोखंडी बोर कटर, दोन लोखंडी कटावणी, दोन मोठे स्क्रु ड्रायव्हर, एक ड्रील मशिन व एक कटर मशिन तसेच हिरो होंडा शाईन नंबर **MH12-KK-4552** असे घरफोडी चोरी करण्यासाठी वापरण्यात येणारे हत्यारे मिळुन आली.

त्यांचेकडे कौशल्याने, शिताफीने व विश्वासात घेवुन तपास करता त्यांनी व त्यांचे पाहिजे साथीदार नामे- ३) सनीसिंग पापासिंग दुधानी रा. स.नं.११०, अंधशाळेमागे, शिकलकरी वस्ती, रामटेकडी, वानवडी पुणे ४) सागरसिंग गुरदेवसिंग बावरी रा.बेळगाव कर्नाटक यांनी मिळुन पुणे शहरातील हडपसर, विश्रांतवाडी, पिंपरी, या वेगवेगळया पोलीस ठाण्याचे हद्दीतील एकुण- ०५ घरफोडी व २ वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. (हडपसर पो.स्टे.कडील ३ गुन्हे, विश्रांतवाडी पो.स्टे.कडील २ गुन्हे व पिंपरी पो.स्टे.कडील २ गुन्हे) त्यांचे ताब्यातुन लाल रंगाची तवेरा नं. **MH14-CK-202**, (मुळ नं.**MH13-B-2620**), हिरो होंडा शाईन नंबर **MH12-KK-4552**, सोन्याचे दागिने २० ग्रॅम वजनाचे, चांदीची वेगवगळी भांडी, एक मोठे लोखंडी बोर कटर, दोन लोखंडी कटावणी, दोन मोठे स्क्रु ड्रायव्हर,एक ड्रील मशिन व एक कटर मशिन व रोख रक्कम १५,०००-०० असे सर्व मिळुन **८,६१,०००-००** चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींनी चोरीचे तवेरा कारला सांगवी येथे पार्क केलेली स्कार्पीओ कार नं. **MH14-CK-202** हिची नंबरप्लेट चोरी करुन ती तवेरा हिला लावुन घरफोडी चोरीच्या गुन्हयात वापरली असल्याचे निष्पन्न झाले आहे.

यातील अटक आरोपीं पैकी बिरजुसिंग रजपुतसिंग दुधानी याचेवर पुणे शहरातील घरफोडी, दरोडा, खुनाचा प्रयत्न असे एकुण - १४ गुन्हे दाखल आहेत. यातील पाहिजे आरोपी सनीसिंग पापासिंग दुधानी, सागरसिंग गुरदेवसिंग बावरी रा.बेळगाव कर्नाटक यांचा गुन्हे शाखेकडुन कसोशीने शोध चालु आहे.

सदरची कामगिरी ही श्री. दिपक साकोरे, पोलीस उपआयुक्त सो. आर्थिक व सायबर गुन्हे, श्री. पी. आर. पाटील पोलीस उप आयुक्त, गुन्हे. श्री.अरुण वालतुरे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-२ यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट -५, पुणे कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. एम.एम.मुजावर, स.पो.निरी.महादेव वाघमोडे, स.पो.निरी.युवराज नांद्रे, पोलीस हवालदार लक्ष्मण शिंदे, माणिक पवार, शिवाजी घुले, प्रदिप सुर्वे, प्रदिप शितोळे,अजय खराडे, प्रविण शिंदे पोलीस नाईक भरत रणसिंग, अमजद पठाण, महेश वाघमारे, सचिन घोलप, प्रविण काळभोर, गणेश बाजारे, प्रमोद घाडगे, अंकुश जोगदंडे, नामदेव आंगज, संजयकुमार दळवी यांनी केली आहे.

